PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 6, ISSUE 3

# कोविड - १९ लॉकडाऊन आणि भारतीय अर्थव्यवस्था

**डॉ. कविता के. लेंडे**
सहाय्यक प्राध्यापक
वाणिज्य व व्यवस्थापन विभाग
एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना -

संपूर्ण जगात पसरलेल्या कोरोना विषाणूची दहशत भारतातही निर्माण झाली आहे. कोरोना विषाणूची बाधा झाल्याची पहिली घटना चीनमधील वुहानमध्ये डिसेंबर २०१९ मध्ये घडली. कोरोनामुळे चीनमध्ये षेकडो लोकांचा मृत्यु झाला. या कोरोनाचा फटका युरोप खंडासह आशिया, अमेरिका, आफ्रिका खंडालाही बसला. त्यानंतर ११ मार्च २०२० रोजी जागतीक आरोग्य संघटनेने (WHO) कोरोनामुळे जागतीक महारोगराई निर्माण झाल्याची घोषणा केली. कोरोना विषाणूने केलेल्या जागतिक हल्ल्यात संपूर्ण जग घेरले गेले. जगभरातले डॉक्टर्स, नर्सेस, आरोग्य कर्मचारी व पोलीस हे जीवावरच्या संसर्गाचा धोका पत्करून या विषाणूशी लढत आहे. संपूर्ण अर्थव्यवस्थेची चाकं ठप्प झालेली आहे. माणसं घरात बंद केली गेलेली आहेत. या सगळया परिस्थितीतं कोरोनाने अख्ख्या जगाला धडा शिकविला आहे. हे कोरोना विषाणूचं विश्वव्यापी वादळ १३ मे २०२० पर्यंत जगभरात एकूण रूग्ण ४३,०४,०००, मृत्यु २,८९,६४९, बरे झालेले १५,५१,७२६ तर भारतात १३ मे २०२० पर्यंत एकूण रूग्ण ७२९५५, मृत्यु २३५५, बरे झालेले २३७८२, महाराष्ट्रात १३ मे २०२० पर्यंत एकूण रूग्ण २४,४२७, मृत्यु ९२१, बरे झालेले ४७८६ होते. या विश्वव्यापी विषाणू वादळाची प्रचंड मोठी मानवीय व आर्थिक किंमत सर्व जगाला भोगावी लागत आहे. आमची विद्यापीठे चार भिंतीत पुस्तकी शिक्षण देतात, पण आयुष्यात एकदाच येणाऱ्या या वैश्विक संकटाने माणसाला बरेच काही शिकविले आहे. जात, धर्म, पंथ, देश, लिंग या सगळया सीमा कोरोनाने भेदल्या आणि माणूसपणाच्या पातळीवर आणून ठेवलयं. सर्व जगभरातल्या माणसाणां.

भारतात गेल्या दिड ते तीन महिण्यापासून कोरोनाच्या विषाणूने भारताची संपूर्ण अर्थव्यवस्था बंद झालेली आहे. बाजारपेठा, औद्योगिक क्षेत्रे, बंदरे, विमानतळ, रेल्वे, बसेस, कार्यालये, भाजीबाजार व मंडी सर्वच बंद आहेत. संपूर्ण देशाचे अर्थचक्र थांबले असून ते पुन्हा सुरू करण्याचे आव्हान देशासमोर उभे आहे. संपूर्ण अर्थव्यवस्था बंद होणे ही एक अभूतपूर्व घटना असून त्यावरील उपाययोजनाही अभूतपूर्व असाव्या लागतील. भारताची अर्थव्यवस्था सध्या (जीडीपी) १८० ते २२० लाख कोटी रूपयांची आहे. हया अर्थव्यवस्थेच्या किमान १०% रक्कम म्हणजेच १८ ते २२ लाख कोटी रक्कम ही अर्थव्यवस्था सुरू करण्यासाठी आवश्यक आहे. भारताची अर्थव्यवस्था (Economy). पायाभूत सोयीसुविधा

(Infrastructure), व्यवस्था (System), लोकसंख्या (Demography), मागणी (Demand) आणि वितरण (Distribution) या पाच आधारस्तंभांवर आधारलेली असून कोरोनामूळे उद्‌भवलेल्या सकटाशी सामना करण्यासाठी वरील पाच आधारस्तंभावर भर द्यावा लागेल. उपलब्ध साधने आणि सामर्थ्य, दर्जेदार उत्पादन, चांगली गुणवत्ता, मागणी व पुरवठा साखळी यांच्या आधारे भारताची अर्थवव्यस्था सशक्त करून जागतीक पातळींवर भारताला आपले स्थान बळकट करण्याची एक संधी कोरोनाने दिलेली आहे. नवीन आव्हानांचा व परिस्थितीचा स्वीकार करून नव्या आत्मविश्वासाने मार्गक्रमण करण्याची व सध्याच्या निराशाजनक परिस्थितीतून प्रगतीच्या दिशेने, जागतीक महासत्तेचे वाटेने, वाटचाल करण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करणे अनिवार्य आहे. एक बलाढय लोकशाही असलेला देश म्हणून इंडिया जगात नावारूपात आला आहे. भारत देशाची अर्थव्यवस्था खऱ्या अर्थाने श्रमिकांच्या खांद्यावर आहे. देशातील लघु, सुक्ष्म आणि मध्यम उद्योगांची स्थिती सर्वजण जाणून आहेत. २०१६ पासून दरवर्षी २० हजार कंपन्या दिवाळखोरीत निघत आहेत. श्रमिकांच्या कायद्यांमध्ये बदल केले जात आहेत. कामाचे तास आणि मजूरी यासंदर्भात संभ्रम आहे. हे सर्व उद्दिष्ट समोर ठेवून प्रस्तुत संशोधन लेखात कोविड–१९, लॉकडाऊन, भारतीय अर्थव्यवस्था, त्यावरील उपाययोजना आणि निष्कर्ष यावर प्रकाश टाकलेला आहे.

### उद्दिष्टे : -

- **लॉकडाऊन काळात भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती जाणून घेणे.**
- **आर्थिक महामारी व बेरोजगारीवर प्रकाश टाकणे.**
- **सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांची स्थिती जाणून घेणे.**
- **कोविड–१९ व कोरोना संदर्भात सखोल माहिती जाणून घेणे.**
- **भारतीय अर्थव्यवस्थेला लॉकडाऊनमुळे झालेल्या नूकसानीचा आढावा घेणे.**
- **लॉकडाऊनमधील अर्थव्यवस्थेवर योग्य त्या उपाययोजना सुचविणे.**

### कोविड - १९

कोरोना हा विषाणू त्याच्या विषाणू जगात नवीन नाही. 'इन्फ्लुएन्झा' या रोगांचे विषाणू कोरोना या गटातीलच आहे. पण त्या विषाणू मधील अनुवांशिक घटकांमध्ये सातत्याने उत्परिवर्तित होत असतात. असाच उत्परिवर्तित कोविड–१९ हा विषाणू आता जो कोरोना वेगाने जग व्यापत आहे त्यासाठी जबबादार आहे. कोरोना विषाणू या महामारीची सुरवात डिसेंबर २०१९ मध्ये झाली होती, आणि येथूनच या विषाणूचा उगम झाला. हा विषाणू एखाद्या प्राण्यातून माणसात संक्रमित झाला असे मानले जाते. चीनमध्ये चित्रविचित्र प्राणी मानवी अन्न म्हणून खाल्ले जातात. अशा प्राण्यांच्या अनियंत्रित बाजारातून किंवा वुहान शहरातील टेस्टीग लॅब मधून हा विषाणू पसरला असा तंज्ञाचा संशय आहे.

सध्या संपूर्ण जगात हाहाकार माजविणाऱ्या कोरोना विषाणूचा उगम नेमका कोणत्या प्राण्यांतून झाला याचा शोध घेवून या विषाणूमुळे पसरलेल्या कोविड–१९ महामारीच्या संदर्भात जागतीक आरोग्य संघटनेने नमुद केल्याप्रमाणे सुरूवातीच्या रूग्णांमधून घेतलेल्या या विषाणूच्या नमुन्याची (सॅम्पलची) प्रयोगषाळेत चाचणी करण्यात आली. त्यानंतर चीनचे अधिकारी आणि जागतिक आरोग्य संघटनेने हा कोरोना विषाणू असल्याचं स्पष्ट केले. कोरोना विषाणूचे अनेक प्रकार

आहेत, मात्र यापैकी केवळ सहा प्रकारच्या विषाणूंचीच माणसाला बाधा होवू शकते. मात्र नव्या विषाणूचा शोध लागल्यानंतर संक्रमित होणाऱ्या कोरोना विषाणूंची संख्या आता सात झाली आहे. कोरोना विषाणूंचा प्रसार रोखण्यासाठी सूचना –

**सूचना –**

- **साबन, पाणी किंवा सॅनिटायजर जेलने वारंवार हात धुणे.**
- **खोकतांना आणि शिकतांना तोंडासमोर टिश्युपेपर किंवा रूमाल धरणे.**
- **वापरलेले टिश्युपेपर फेकून देवून पुन्हा हात धुवा.**
- **तुमच्याकडे टिश्युपेपर नसतील तर कपडयाचा बाहयांना पुसा.**
- **हात न धुता डोळे, नाक आणि तोंडाला स्पर्श करणे टाळा.**
- **कोरोनाबाधित रूग्णांशी संपर्क टाळा.**
- **विशिष्ट अंतर ठेवूनच व्यवहार करा.**
- **मास्क वापरा आणि विलगीकरणात राहा.**

**कोरोनाची लक्षणे -**

कोरोना विषाणू थेट फुफ्फुसांवर हल्ला करतो, यामूळे साधारणतः दोन लक्षणं दिसू लागतात. १) ताप येतो २) कोरडा खोकला यापैकी काहीही एक झाले तरी श्वास घेण्याचा त्रास होवू शकतो. खोकला जर थांबत नसेल, तासंतास सातत्याने खोकत असाल तर नेहमीच्या खोकल्यापेक्षा हे लक्षणं गंभीर आहे. जेव्हा ताप येतो तेव्हा आपल्या शरीरांच साधारण तापमान ३७.८ सेल्सिअस (९८.६’ F) पेक्षा जास्त असू शकतो. त्यामुळे कणकण, थंडी, थरथरल्या सारखी लक्षणं दिसायला लागतात. कोराना विषाणूची लक्षणं दिसायला कधी पाचं दिवस लागू शकतात. तर कधी त्याहून जास्त. WHO नूसार हा विषाणू आपले परिणाम माणसांच्या शरीरात दाखविण्यासाठी १४ दिवस सुद्धा घेवू शकतो. यालाचा ‘इन्क्यबेशन पिरियड’ म्हणतात. कोरोना विषाणू लक्षणांमध्ये सर्वात आधी ताप येणे, मग कोरडा खोकला येणे, एक आठवडयानंतर श्वास घेण्यास त्रास होणे, त्यानंतर मग रूग्णाला दवाखान्यातील उपचारांची गरज असते.

**अमेरिकेच्या सेंटर फॉर डिसीज कंट्रोलने दिलेल्या ताज्या माहिती नूसार लक्षणं पुढीलप्रमाणे –**

१) ताप किंवा थंडी वांजणे

२) थरथरणे

३) स्नायूंमध्ये दुखणे

४) डोकेदुखी

५) खोकला किंवा घसा खवखवणे

६) चव न कळणे किंवा वास न येणे

कोरोना विषाणूमुळे मृत्युमुखी पडणाऱ्याचे प्रमाण सुमारे १ ते २ टक्के आहे. पण हे आकडे पूर्णत: विश्वासार्ह नाहीत. कारण काही ठिकाणी रोगाचं निदान करण्याची पुरेशी व्यवस्था नाही, तर काही दुसऱ्या ठिकाणी लक्षणं दिसत नसल्यामुळे रूग्णांची ओळख पटत नाही.

जागतिक आरोग्य संघटनेने सुमारे ६५ हजार रूग्णांचा अभ्यास करून तयार केलेल्या आकडेवारीवरून पुढील निष्कर्ष काढलेत –

१) ६% रूग्ण चिंताजनक परिस्थितीत पोहचतात. म्हणजेच त्यांची फुफ्फुस निकामी होतात. त्यांना इतर संसर्ग होतात, अवयव निकामी होतात, आणि मृत्युचा धोका ओढवतो.

२) १४% रूग्णांमध्ये गंभीर लक्षणं दिसतात ; श्वास घेण्याचा त्रास होतो, इत्यादी

३) ८०% रूग्णांमध्ये सौम्य लक्षणं दिसतात ; जसे ताप, खोकला किंवा न्युमोनियाची लक्षणं.

आतापर्यंतच्या आकडेवारीवरून असं लक्षात येते की, ज्यांना आधीच कुठला ना कुठला आजार आहे, जसे दमा, मधुमेह, उच्च रक्तदाब, ह्रदयविकार अशांना या रोगाची लागणं होण्याची शक्यता जास्त असते. महिलांपेक्षा पुरूषांना जास्त धोका आढळून येतो. कोरोना विषाणूचा प्रसार खोकला किंवा शिंकेतून बाहेर पडणाऱ्या तुषारांमधून किंवा असे तुषार पडलेल्या जागी स्पर्श केलेला हात नाका तोंडाला लागल्याने होत असल्याचे आतापर्यंतच्या संषोधनातून दिसून आले आहे. गर्दीच्या ठिकाणी कोरोना विषाणु संसर्गाचा धोका जास्त असल्याचं तज्ञाचं मतं आहे. कोरोनाचा उगम, उद्रेक आणि जगभर प्रसार हि परिस्थिती अतिशय गंभीर असून कोरोना जगातून कधी हद्दपार होईल हे काहीच सांगता येत नाही. जागतीक आरोग्य संघटनेनेही कोरोनासह जगण्याच्या पद्धती जगाला शोधून काढाव्या लागतील असा इशारा दिला आहे.

## लॉकडाऊन (ताळेबंदी) –

लॉकडाऊन चा शाब्दिक अर्थ आहे ताळेबंदी. ज्याप्रकारे एखाद्या फॅक्ट्रीला/कारखान्याला बंद केले जाते तेथे ताळेबंदी केली जाते आणि कोणीही आत जावू शकत नाही. दुर्मिळप्रसंगी लॉकडाऊनचा निर्णय घेतला जातो. लॉकडाऊन नागरिकांच्या जीवीताची काळजी घेण्यासाठीच घेतला जातो. कोरोना विषाणूमूळे जगात हाहाकार होत आहे. त्यामूळे खाजगी कंपन्याना लॉकडाऊन करण्याचा निर्णय घेतला आणि कर्मचाऱ्यांचे प्राण वाचू शकले.

संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन केला जातो. युद्ध, साथीचे आजार आणि आणीबाणी अशा प्रसंगी लॉकडाऊन करतात. लॉकडाऊन करण्यात आलेल्या ठिकाणांवर लोकांना घरातून बाहेर पडण्यास प्रतिबंध असतो. केवळ धान्य, औषधी, भाज्या अशा अत्यावश्यक वस्तूंसाठीच बाहेर पडण्याची परवानगी असते. लॉकडाऊनमध्ये जीवनावश्यक वस्तू आणि सेवा वगळता सर्व बंद ठेवण्यात येतात. शाळा, महाविद्यालये, कंपन्या, ऑफिस, थिऐटर, दुकाने, वाहतूक, हॉटेल, रेस्टॉरंट, बार बंद ठेवली जातात. लॉकडाऊनमध्ये जमावबंदी असते. बाहेर फिरण्यास परवानगी नसते. लॉकडाऊनमध्ये नागरिकांना त्यांचा परिसर सोडून दुसरीकडे जाण्यास प्रतिबंध असते. लॉकडाऊन किती काळासाठी असेल हे तत्कालीन परिस्थितीवर अवलंबून असते, लॉकडाऊनचा उद्देश एकच असतो की, नागरिक एकमेकांच्या संपर्कात येवू नये. भारतात लॉकडाऊन खालीलप्रमाणे केल्या गेले.

१.० प्रथम लॉकडाऊन – २५ मार्च २०२० ते १४ एप्रिल २०२० (२१ दिवस)

२.० द्वितीय लॉकडाऊन – १५ एप्रिल २०२० ते ३ मे २०२० (१९ दिवस)

३.० तृतीय लॉकडाऊन – ४ मे २०२० ते १७ मे २०२० (१४ दिवस)

४.० चतुर्थ लॉकडाऊन – १८ मे २०२० ते ३१ मे २०२० (१४ दिवस)

हया लॉकडाऊनचा उद्देश भारतात कोरोना विषाणु महामारीचा प्रकोप थांबविणे, नागरिकांना घराबाहेर पडण्यास थांबविणे, दवाखाना, बँक, किराणा दुकान आणि अत्यावश्यक वस्तू व सेवा सोडून, गैर आवश्यक सेवा व दुकाने बंद करणे. व्यापार आणि खाजगी संस्थाने बंद ठेवून फक्त ''वर्क फॉर्म होम' ही संकल्पना राबविणे. सर्व शैक्षणिक, प्रशिक्षण, संशोधन केंद्र, संस्थाने, पूजास्थळे बंद ठेवणे, सर्व गैरआवश्यक सार्वजनिक व खाजगी वाहने बंद ठेवणे. सर्व सामाजिक, राजकीय, क्रिडा, मनोरंजन, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्यावर प्रतिबंध लावणे. जागतिक आरोग्य संघटनेचे (WHO) प्रतिनिधी हॅक बेकेडम यांनी 'योग्यवेळी व्यापक व मजबुत' लॉकडाऊन केल्याने भारताची प्रशंसा केली. जागतिक आरोग्य संघटनेचे (WHO) कार्यकारी निर्देशक मादूक रयान म्हणतात. लॉकडाऊनमुळे कोरोना विषाणू संपणार नाही परंतू भारतात संक्रमणाची दुसरी व तिसरी लहर थांबविण्यासाठी अत्यावश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योग्य वेळी लॉकडाऊन केल्यामूळे २० लाख कोरोना रूग्ण होणे आणि ७८ हजार मृत्यु रोखता आले. लॉकडाऊन नसते तर १४ ते २९ लाख रूग्ण भारतात असते. लॉकडाऊन जाहीर झाला आणि कोटयावधी लोकांनी घरातच राहून लॉकडाऊन पाळला.

भारतात लॉकडाऊनची घोषणा झाल्याबरोबर अत्यावश्यक वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी गर्दी केली. ॲमेझॉन व फ्लिपकार्ड ने आपल्या सेवा अस्थायी स्वरूपात बंद केल्या. अनेक राज्यानी खाद्य वितरण सेवेवर प्रतिबंध आणले. लॉकडाऊन मूळे व्यवसाय व उद्योग बंद झाल्याने अनेक कामगार आणि मजूर बेरोजगार होवून शहराकडून गावाकडे वळले. कोविड–१९ चाा मृत्युदर ३.१३ वरून ३.०२ टक्क्यांवर आला. लोकांनी मास्क वापरून सोशल डिस्टनसिंगचे पालन केले. त्यामुळे जगात इतर देशात कोविड–१९ चा जसा फैलाव झाला, तसा भारतात झाला नाही. परंतू लॉकडाऊनचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम भयंकर आहे.

### भारतीय अर्थव्यवस्था –

कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर लागू असलेल्या लॉकडाऊनमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला ७ – ८ लाख करोड रूपयांचे नुकसान झाल्याची शंका आहे. असे उद्योग समूहाने अनुमान केले आहे. कारखाने आणि व्यवसाय, विमान सेवा, रेल्वे सेवा, बससेवा बंद केली गेली. लॉकडाऊनमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला २१ दिवसाच्या लॉकडाऊन दरम्यान प्रती दिवस जवळजवळ ४.६४ अरब डॉलर (३८००० करोड रूपयांपेक्षा अधिक) नुकसान होत होते. तसेच GDP (सकल घरेलु उत्पाद) ९८ अरब डॉलर (जवळजवळ ७.५ लाख करोड रूपये) इतके नूकसान झाले आहे.

मूडीज या आंतरराष्ट्रीय पतमापन संस्थेने चालु आर्थिक वर्षामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर शून्य टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. हा अंदाज फक्त दोन महिण्याच्या कालावधीचा आहे. पुढील वर्ष आशादायक असल्याचा अंदाजही व्यक्त केला आहे. भारताने मार्च महिण्याच्या शेवटच्या आठवडयापासून लॉकडाऊन सुरू केले. त्यामुळे अर्थव्यवस्था ठप्प झाली. दोन महिण्यांपूर्वी विकासदर १.८ टक्के राहण्याचा अंदाज होता. मात्र सुधारित अंदाजात तो

शून्य टक्क्यांवर आला आहे. कोरोना विषाणूमुळे झालेली अर्थव्यवस्थेची घसरण सुरूच आहे. मागील वर्षी अर्थव्यवस्थेचा विकास दर ४.८% राहण्याचा अंदाज होता. त्यानंतर तो १.८% वर आला. भारतामध्ये कमी झालेला रोजगार उपलब्धतेचा दर, ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेवर आलेला ताण, तसेच बँका व अन्य आर्थिक कंपन्यांकडून कमी प्रमाणात होत असलेला कर्जपुरवठा यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला फटका बसत आहे.

कोरोना संकटाशी जग लढत आहे. हा साथीचा रोग दिर्घकाळ चालेल, परंतू जनजीवन आणि आर्थिकघडी नीट व सुरक्षित बसविण्यासाठी उद्योजकांना भरपूर संधी दिली पाहिजे. संकटावर मात करून सर्व उद्योजकांचा मार्ग सुकर करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या संकटावर मात करून भारतीय अर्थव्यवस्था बळकट करणे ही काळाची गरज आहे. पंतप्रधानांच्या २० लाख कोटीच्या आर्थिक पॅकेजचा फायदा उद्योजकांना संधी म्हणून द्यावा लागेल. रोजगार निर्मिती ही आर्थिकदृष्टया सुदृढ होण्यासाठी महत्वाची असते. तसेच अर्थव्यवस्था सुदृढ करण्यासाठी निर्यातीची भूमिका महत्वाची असून, निर्यातीला प्रोत्साहन मिळत नाही. भारताच्या शाश्वत आणि आर्थिक विकासासाठी शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग जे बंद झालेत ते मोठया प्रमाणावर सुरू करण्याची गरज आहे. त्यासाठी अर्थव्यवस्था सक्षम करणाऱ्या उद्योगांना शासनातर्फे प्रोत्साहन देण्याची गरज आहे. भारतीय उद्योजक आणि भारताबाहेरील उद्योजकांना काय हवे ते त्यांना देवून नवीन कंपन्यांना जागा आणि कामगार उपलब्ध करून द्यायला हवे. देशातील औद्योगिक उत्पादनापैकी ६०% उत्पादन देशातच विकले जाते. परंतू लॉकडाऊनच्या ५०–५५ दिवसाच्या काळात १४ कोटी व्यक्तीचे रोजगार/नोकऱ्या संपल्याने नवीन वस्तू किंवा उत्पादने खरेदी करण्यासाठी पोषक वातावरण नाही. जागतिक मंदीची स्थिती वर्तविली जात आहे. भारतातील १५ क्षेत्रांना लॉकडाऊनचा मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

NBFC (Non Banking Financial Company), बँकिंग, रिटेल, टेक्सटाइल, आयटी, रिअल इस्टेट, ऑटो आणि मेटल्स ही क्षेत्रे मोठया परिणामांच्या कक्षेत आहे. टेलीफोन, ऊर्जा, फार्मा आणि कृषी क्षेत्रावर कोरोनाचा प्रभाव कमी होईल. ग्राहकोपयोगी वस्तू, मिडिया, इलेक्ट्रीकल्स, केमिकल्स आणि विमा या क्षेत्रावर माफक परिणाम होईल.

लॉकडाऊनच्या काळातील परिस्थितीचा सकारात्मक परिणाम म्हणून टेलीकॉम क्षेत्र नव्याने उदयास येईल. या काळात जगभरातील डेटा ट्रफिकमध्ये २० ते ३०% वाढ झालेली आहे. याच कालखंडामध्ये विजेची मागणी २५ ते ३०% घसरली असून वीज वापराचे प्रमाण आणि किंमतीमध्ये घसरण झालेली आहे. सप्टेंबर २०२० पर्यंत मागणीमध्ये पुन्हा वाढ होण्याची शक्यता आहे. वीजमागणी व पुरवठयातील समतोल साधारण वर्षभरात सुरळीत होईल असा अंदाज आहे. या लॉकडाऊनच्या काळात फार्मा क्षेत्रावर कमी परिणाम झाला आहे. आर्थिक वर्ष २०२०–२१ च्या चौथ्या तिमाहीत फार्मा क्षेत्रात प्रचंड वाढ होईल. कारण यंदा पावसाचा अंदाज चांगला असल्याने कृषी क्षेत्रावर लॉकडाऊनचा सौम्य परिणाम होईल.

आर्थिक वर्ष २०१९–२० मध्ये जीडीपीमध्ये मोठी घसरण झाल्याने तसेच लॉकडाऊनमध्ये मागणी पुरवठा साखळी आणि आर्थिक परिणाम पाहता ऑटो क्षेत्राला सावरण्यासाठी २०२२ पर्यंत वाट पाहावी लागेल.

आर्थिक वर्ष २०२०–२१ मध्ये सिमेंट क्षेत्रात दोन आकडी घसरण होण्याची शक्यता आहे. अनेक सिमेंट कंपन्यांनी नूकतीच क्षमता वृद्धी केलेली असली तरी त्यांचा ताळेबंद चांगल्या स्थितीत आहे.

लॉकडाऊनच्या मंदीमुळे आयटी क्षेत्रात मागणी आणि पुरवठा अशा दोन्हीवर परिणाम होत आहे. आयटी क्षेत्रातील ३०% खर्च रद्द करून पूढे ढकलले जातील. देशात सुरू असलेल्या लॉकडाऊनच्या काळात माहिती–तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यक्तींना घरून काम करण्याची (वर्क फॉर्म होम) परवानगी देण्यात आली आहे. ही सवलत कायमस्वरूपी मिळण्याची मागणी उद्योगांकडून केली जात आहे. त्यासाठी कामाचे तास आणि शिफ्टमध्ये बदल करून खर्चात कपात करण्याचा मानस आहे. लॉकडाऊनमुळे आयटी उद्योगातील सुमारे ९०% कर्मचारी घरूनच काम करीत आहे व येत्या जुलैपर्यंत ही सवलत मिळणार आहे. कोरोना विषाणूमुळे बलाढय अशा टाटा समूहाने आपल्या सर्व कंपन्यांच्या संचालकांच्या मानधनात जवळपास

२०% कपात केली आहे. टाटा समूहाच्या १५२ वर्षाच्या इतिहासातील ही प्रथम घटना होय. (टाटा समूह – टाटासन्स, टाटा मोटर्स, टीसीएम, टाटा स्टील, टायटन इंडस्ट्रीज, इंडियन हॉटेल्स, व्होलटाज इ.)

जगभरातील सुरू असलेल्या लॉकडाऊनमुळे भारतामध्ये होणारी सोन्याची आयात एप्रिल महिण्यामध्ये १००% घटली आहे.

नजीकच्या काळातील फिजिकल डिस्टन्सिंगमुळे रिटेल क्षेत्राला जबरदस्त फटका बसला आहे. रिटेल व्यवसायामध्ये सर्वाधिक परिणाम कपडयांच्या व्यवसायावर दिसून आला. त्यानंतर फूड रिटेलर (रेस्टॉरंट) वर परिणाम दिसून आला. देशात असलेल्या ६० दिवसाच्या लॉकडाऊन काळात रिटेल क्षेत्रातील व्यवसायाचे ९ लाख कोटी रूपयांचे व्यवहार ठप्प झाले यामुळे केंद्र व राज्यसरकारांना दिड लाख कोटी रूप्यांच्या जीएसटीच्या उत्पन्नांवर पाणी सोडावे लागले. देशातील किरकोळ व्यापाराच्या क्षेत्रात ७ कोटी व्यापारी कार्यरत असून त्यांच्याकडून दरवर्षी सुमारे ५० लाख कोटी रूपयांचा व्यवहार होत असतो. रिटेल क्षेत्रावर ४० कोटी व्यक्ती उदरनिर्वाहासाठी अवलंबून आहे.

बॅकींग क्षेत्राचा विचार केला तर, बॅकिंग आणि एनबीएफसी (Non Bank Financial Company) ला मंदावलेल्या प्रगतीमुळे अधिक ताण दिसून येतो. बॅकिंग क्षेत्र हे आज अर्थव्यवस्थेचे द्योतक मानले जाते. कर्जाची घटलेली मागणी, कर्ज बुडविण्याचे वाढलेले प्रकार, नोटाबंदी, जीएसटी नंतर काहीशा तणावात असणाऱ्या कार्पोरेट क्षेत्राकडून कर्जवसूली होण्यातील विलंब यामूळे बॅकींग क्षेत्र चिंतेत आहे. उद्योगातील फक्त १३% कामगारांच्या हाताला काम आहे. कच्च्या मालाच्या पुरवठा साखळीत येणाऱ्या अडचणी, रेड झोनमधील उद्योग सुरू करण्यास तूर्तास बंदी, परप्रांतीय कामगारांचा तुटवडा, कामगारांचा आरोग्य विमा आणि कारखान्यांच्या निर्जंतुकीकरणापर्यंतच्या अनेक अटी यामुळे कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेत अडथळे येत आहेत. त्याचा परिणाम उद्योग व्यवसायावर दिसून येत आहे.

एखादा मोठा उद्योग मोटारीचे उत्पादन करीत असेल तर त्यासाठी लागणारे छोटे मोठे सुटे भाग हे एमएसएमई (Micro Small & Medium Enterprises) म्हणजेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग पुरवित असतात. भारतातील एकूण ४० कोटी नोकऱ्यांपैकी १० ते १२ कोटी नोकऱ्या एमएसएमई पुरविते. 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमीच्या म्हणण्यानुसार भारतात हे बेरोजगारीचे प्रमाण २७ टक्क्यांपर्यंत पोहचले आहे. म्हणजेच लॉकडाऊनच्या काळात १४ कोटी लोकांचे रोजगार गेले आहे. यापैकी २ कोटी नोकऱ्या एमएसएमई क्षेत्रातील आहे.

कोरोना लॉकडाऊनमुळे विमान कंपन्या डबघाईस आल्या आहेत. कारण पर्यटन क्षेत्राला जबरदस्त झटका बसल्याने, अर्थातच विमान कंपन्याना क्षळ पोहचली असून, विमान कंपन्या त्यांच्या कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करत असून पे कट कर्मचाऱ्यांना सोसावा लागत आहे. आधीच बुक केलेल्या तिकिटांचे पैसे परत करण्याची वेळ विमान कंपन्यांवर आली आहे. हीच बाब सर्वच प्रवासी सेवेच्या बाबतीत दिसून येते. लॉकडाऊनमुळे टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स क्षेत्राला मोठा फटका बसला आहे. ४०% पर्यटन कंपन्या बंद पडण्याची शक्यता आहे. पर्यटनक्षेत्राच्या पुर्नभरणासाठी मदतीची गरज या उद्योजकांनी व्यक्त केली आहे.

ऑटोमोबाईल उद्योगांचा भारताच्या जीडीपीमध्ये सुमारे ७% हिस्सा आहे. देशातील जवळजवळ ४ कोटी लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार या उद्योगातून मिळतो. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर (Tax) संकलनात या उद्योगांचा वाटा ७% असून, गेल्या एक वर्षापासून मंदी असून उत्पादन व विक्रीचा आलेख खाली आलेला आहे. एप्रिलमध्ये एकाही वाहनांची विक्री झाली नाही. कोविड–१९ लॉकडाऊननंतर अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी वाहत उद्योगाला काही सवलती देण्याची नितांत गरज आहे.

बेरोजगारी–देशामध्ये सुरू असलेल्या लॉकडाऊननंतर बेरोजगारीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. बेरोजगारीचा दर २७% वर पोहचला आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागातील बेरोजगारीचा दर जास्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी (सीएमआयई) ने ३ मे अखेरच्या अहवालानुसार देशात लॉकडाऊन सुरू झाले

तेव्हा बेरोजगारीचे प्रमाण ६% होते आज ते २७.१२% झाले आहे. लॉकडाऊननंतर महानगरातील उद्योगधंदे बंद झाल्याने मोठया प्रमाणात बेरोजगारी वाढली असून अनेक स्थलांतरित कामगार पुन्हा आपल्या मुळगावी परतले आहेत.

एप्रिल महिण्यात देशातील लोखंडाच्या उत्पादनामध्ये मोठी घट झालेली दिसून येते. या महिण्यात लोखंडाचे उत्पादन ६५% ने कमी होवून ३१.३ लाख टनावर आले आहे. लॉकडाऊनच्या काळात जवळपास सर्व कारखाने बंद असल्याने लोखंडाची मागणी उत्पादन आणि पुरवठा या सर्वांवर परिणाम दिसून आला. मागील वर्षे एप्रिल महिण्यात देशात ९०.२ लाख टन लोखंडाचे उत्पादन झाले होते. यांच्या तुलनेत यंदा ६५% घट झाली आहे. जागतिक स्तरावर ही घट १३% (एप्रिल महिण्यात) आहे.

कोरोनाचा भारतीय अर्थव्यवस्थेला बसलेला फटका खूप मोठा असणार आहे. यामूळे देशांतर्गत उत्पादनातील सुमारे १०% रक्कम ही कायमस्वरूपी कमी होणार असल्याची शक्यता क्रिसील CRISIL (Credit Rating Information Services of India Limited) ने वर्तविली आहे. तसेच मंदीच्या प्रभावातून बाहेर पडण्यासाठी जवळपास तीन वर्षाचा कालावधी लागण्याची भीतीही वर्तविली आहे. त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था पून्हा रूळावर आणणे हे एक मोठे आव्हाण आहे.

**उपाययोजना :—**

कोविड—१९ लॉकडाऊननंतर अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी वाहन उद्योगाला आणि सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगाला काही सवलती देण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे रोजगार निर्माण होईल आणि कोरोना महामारीमुळे निर्माण झालेल्या मंदीच्या वातावरणाला संजीवनी मिळेल.

- पेट्रोलपंपावरील उत्पादन शुल्कात लिटरमागे १० रूपये व डिझेलवरील उत्पादन शुल्कात लिटरमागे १३ रूपये एवढी विक्रमी वाढ केल्याने चालु वित्तीय वर्षात केंद्रसरकारला पेट्रोल व डिझेलपासून १.६ लाख कोटी रूपयांचा जादा महसूल मिळेल.
- जीएसटीमध्ये कपात करण्याबरोबरच उद्योग क्षेत्राचा परवाना व परमिट शुल्क, सेवा शुल्क, भाडेपट्टा इत्यादीसारखा सरकारी देयकांवर स्थगिती आणि आयकर, कॉर्पोरेट कर आणि जीएसटी या व्यावसायिक करांचा त्वरीत परतावा देण्यात यावा.
- मुदतीच्या कर्जाची परतफेड आणि कार्यरत भांडवली कर्जावर काही महिण्याची स्थगिती देण्यात यावी.
- आयकर विवरणपत्र व तारखांमध्ये सहा महिने मुदतवाढ देण्यात यावी.
- राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे, पायाभूत सुविधा, कंत्राटदारांना सहा महिने, अधिक मुदतवाढ देण्यात यावी.
- स्थावर मालमत्ता, क्षेत्रातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सहा महिने मुदतवाढ देण्यात यावी.
- तारणाविरहित कर्जे देण्याची तरतूद करण्यात यावी.
- पुढील काही काळ व्यापार प्रदर्शने व व्यापार मेळाव्यांमध्ये सहभागी होवून उत्पादनासाठी मागणी निर्माण करणे अडचणीचे होणार असल्याने फिनटेक तंत्रज्ञानाचा वापर करून एमएसएमईला ई—मार्केटिंगची सोय उपलब्ध करून द्यावी.
- लॉकडाऊनमधील आर्थिक समस्यांना तोंड देण्यासाठी करण्यात आलेली तरतूद तूटपूंजी आहे. त्यामुळे जीडीपीच्या पाच टक्के तरी खर्च भारताने नागरिकांवर करावा.
- पहिल्या व शेवटच्या श्वासाची साक्षीदार असलेल्या परिचरिकेना प्रतिष्ठा व सुरक्षेची हमी द्यावी.

- शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांच्या खरेदीची पूर्ण हमी दिली जावी. तसेच शेतीसाठीच्या कर्जावरील व्याज चार ते सहा महिने माफ केले जावे.
- शाळा व महाविद्यालय बंद ही मोहिम शिक्षण विभाग चालवित आहे. ऑनलाईन, डिजिटल माध्यमांचा उपयोग करून विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला आहे. अजूनही ३७% लोकांकडे दूरचित्रवाणी व मोबाईल नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित होणार आहे. त्यासाठी सुधारित नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अवलंबिणे गरजेचे आहे.
- बँक आणि रिझर्व्ह बँक यांचे नातेसंबंध तपासण्याची गरज आहे. तसेच ठेवीदारांचे हितसंबंध जोपासण्यासाठी रिझर्व्ह बँकेने प्रतिनिधित्व करावे.
- वर्क फॉर्म होम बाबत ठोस कायदा करण्यात यावा म्हणजेच वर्क फॉर्म होमचे नियोजन करून आर्थिक वर्ष २०२०—२१ चे आर्थिक नियोजन करावे.
- शासनाने आयटी कर्मचाऱ्यांवरील कपातीच्या संकटावर तोडगा काढावा.
- विदेशी ते स्वदेशी किंवा 'ग्लोबल ते लोकल' ही संकल्पना प्रत्यक्षात राबविण्यात यावी.
- मजूर वर्गासाठी 'ग्लोबल व्हिलेज' संकल्पना प्रत्यक्षात राबविण्यात यावी. विकासाचे मॉडेल बॉटम टू टॉप असे असायला हवे. सर्व मजूरांना गावीच कामाची संधी मिळावी.
- बँकींग प्रणाली पारदर्शक करण्यात यावी.
- देश घडविणाऱ्या कामगारांच्या योगदानाची केंद्र व राज्यसरकारने जाण ठेवायला हवी.
- गुंतवणुकीचे उद्योगात रूपांतर करण्याची कोविड ही मोठी असून त्यांचा फायदा देशाने घ्यावा.
- पूर्ण पगार न देणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी.
- रोगमूक्त भारत बनविण्यासाठी सर्वांनी जबाबदारी स्विकारावी.
- आयकर कायदा, जीएसटी कायदा, तसेच बँकेच्या काही नियमांमध्ये व्यावसायिकांना तसेच इतर कायदयास अनेक सवलती देण्यात याव्यात.
- भारतीय अर्थव्यवस्थेची पुर्न उभारणीसाठी १५ लाख कोटीचे पॅकेज गरज आहे.
- राज्य सरकारला तातडीने पैसे मिळवून देणाऱ्या व्यवसायांना प्राधान्याने सुरू करावे (उदा. दारू दुकाने, बांधकाम व्यवसाय) आणि कुशल कामगार उपलब्ध व्हावे यासाठी नवीन धोरणेही आखावीत.
- उदयोन्मुख व्यवसाय आणि व्यावसायिकांना प्रोत्साहन द्यावे तसे नियम आणि धोरणे बनवावीत, शहरी गरीब, परराज्यातून आलेले कामगार, किरकोळ विक्रीच्या जागा. (व्हेंडींगस्पेसेस) तसेच सार्वजनिक मोकळया जागांचा पर्यायी वापर या संदर्भात नव्याने नियमाची गरज आहे.
- तसेच उद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात.
- विदेशी गुंतवणूकदारांसाठी विशेष कृतीदलाची स्थापना करावी. त्यासाठी औद्योगिक वातावरण, उद्योगासाठी पायाभूत सोयीसुविधा, कुशल मनुष्यांना उपलब्ध करून द्यावेत.

**निष्कर्ष :-**

जेव्हा जागतीक अर्थव्यवस्थेत पडझड होते तेव्हा प्रत्येक व्यवसायासाठी संकट असते. म्हणूनच या कठीण परिस्थितीत घाबरून न जाता त्यास सामोरे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कृषी, औद्योगिक आणि सेवा क्षेत्रातील प्रत्येक

व्यवसायिकाने स्वत:च्या अडचणीचे, परिस्थितीचे विश्लेषण करून उपाययोजना केल्या पाहिजेत आणि त्यानुसार कार्य केले पाहिजे.

समाजातील शेवटच्या घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या पाहिजे. वर्क फॉर होम च्या माध्यमातून घरातून काम करणाऱ्यांच्या मानसीक आरोग्यावर लॉकडाऊनमुळे परिणाम होवू शकतो. कारण माणसांचा, माणसांशी, समोरासमोर बसून संवाद होणे अत्यंत आवश्यक असते. प्रत्येक माणूस दुसऱ्यांशी जोडला जाणे आवश्यक असते. कोरोनाच्या संकटाच्या काळात रडण्यापेक्षा लढून भविष्य घडविणे अत्यावश्यक आहे. आशा जिवंत ठेवून आपण पून्हा आकाशात उंच भरारी घेवू शकतो, फक्त सकारात्मक दृष्टीकोन बाळगण्याची आणि परिस्थितीवर मात करण्यासाठी योग्य प्रयत्न तातडीने करण्याची गरज आहे.

६०० कोटीची उलाढाल लॉकडाऊनमुळे (गूढीपाडवा, अक्षय तृतीया, गुरूपुण्यामृत, रमझान इत्यादी) सणांच्या काळात कमी होवून अर्थव्यवस्था ठप्प झाली. एप्रिलमध्ये प्रथमच वाहन विक्री कमी होवून आर्थिक घडामोठी ठप्प झाल्या. अमेरिका आणि चीनदरम्यान व्यापार युद्धाची भिती आणि जागतीक अर्थव्यवस्थेबाबत जाहिर होणारे नकारात्मक अंदाज यामूळे गुंतवणूकदारानी सावध भूमिका घेतली आहे.

## संदर्भ -

1. http://www.newsindianexeress.com
2. http://www.bbc.com
3. https://maratha.webdunia.com
4. https://hi.m.wikipedia.org
5. Daily Newspaper Lokmat (March, April, May)
6. https://navbharattimes.indiatimes.com
7. zeenews.india.com
8. https://m.economictimes.com